# अक्षर वाङ्मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. ३

फेब्रुवारी २०२३



मुख्य संपादक

डॉ. नानासाहेब सुर्यवंशी

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I)
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. ३

फेब्रुवारी २०२३

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

**कार्यकारी संपादक**
डॉ. शिवाजीराव देशमुख

---

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५
मुद्रक: श्री. जे प्रिंटिंग प्रा लिमिटेड १४१६ सदाशिव पेठ पुणे- ४११०३०
**साहित्य व वर्गणी पाठवण्याचा पत्ता**: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर,
जि. लातूर, ४१३५१५
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी: रु ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु २०००/-
अंक मूल्य : रु १२५/-

---

- महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ या नियतकालकाच्या प्रकाशनात अनुदान दिले असले तरी या नियतकालिकेतील लेख लेखांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

- या अंकातील लेखातून व्यक्त झालेले लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असं नाही.

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# अनुक्रमाणिका


| अ. क्र | | पृ. क्र |
|---|---|---|
| 1 | कीर्तन परंपरा आणि बदलाचे स्वरूप<br>**डॉ. दत्तात्रय महादेव डांगे** | 1-3 |
| 2 | पोवाडा या प्रयोगरूप लोककलेचे बदलते स्वरूप<br>**डॉ. सोनू धोंडू लांडे** | 4-6 |
| 3 | विदर्भातील 'गंगासागर' या प्रयोगरूप लोकनाट्याचे बदलते स्वरूप<br>**प्रवीण सदानंद गायकर** | 7-9 |
| 4 | जागरण' या विधिनाटयाचे बदलते स्वरुप<br>**प्रा.डॉ. जवाहर मोरे** | 10-12 |
| 5 | जागरणाचे बदलते स्वरूप<br>**डॉ. नवनाथ विश्वनाथ पाटोळे** | 13-14 |
| 6 | पेशवेकालीन तमाशा (लोकनाट्य)<br>**प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी** | 15-16 |
| 7 | दास्तांगोई : स्वरूप, इतिहास व वर्तमान<br>**डॉ. गीता मांजरेकर, प्रा. आशा कुंभार** | 17-21 |
| 8 | गोमंतकीय लोकनाट्य: पारंपरिक स्वरूप<br>**डॉ. सुनीता उम्रस्कर** | 22-24 |
| 9 | गोमंतकीय कुळमी जमातीचा 'शिगमा': स्वरूप, प्रकार आणि वाङ्मय<br>**प्रा.जयेश गावकर** | 25-30 |
| 10 | गोमंतकातील काणकोण तालुक्यातील 'काला': प्रयोग आणि बदलते स्वरूप<br>**प्रा. हेमंत अय्या** | 31-40 |
| 11 | 'कंसवध' या लोकगीतातील बदलता भाषिक अविष्कार<br>**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत** | 41-48 |
| 12 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील शाहीराचे योगदान<br>**अमृता रामसेवक मुखेकर** | 49-50 |
| 13 | खंडोबाचे जागरण : एक प्रयोगरूप लोककला<br>**प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे** | 51-53 |
| 14 | मिथके आणि प्रायोगिक कलाविष्कार<br>**डॉ . संजय रमेश मेस्त्री** | 54-57 |
| 15 | प्रायोगिक लोककला आणि 'वाक'तत्त्व<br>**श्रीमती सूळ वैशाली मोहन, प्रा. डॉ. राजेंद्र खंदारे** | 58-60 |
| 16 | प्रयोगरूप लोककला - बदलते स्वरूप :'भारुड'<br>**सौ आश्लेषा सचिन कुंभार, प्रा. डॉ. दिलीप भिमराव गायकवाड** | 61-64 |
| 17 | आसाराम लोमटे यांच्या कथेतील अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या लढाऊ स्त्रिया<br>**संजय नामदेवराव आठवले** | 65-70 |

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010
ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# गोमंतकीय लोकनाट्य: पारंपरिक स्वरूप

**डॉ. सुनीता उम्रस्कर**
सहयोगी प्राध्यापक , शणै गोंयबाब साहित्य आणि भाषा महाशाळा गोवा विद्यापीठ, गोवा

प्रत्येक प्रदेशाची आपली एक संस्कृती असते व लोकवाङ्मय हे त्या संस्कृतीचे किंबहुना लोकसंस्कृतीचे द्योतक असते. गोमंतक हा प्रदेश निर्सगाच्या समृध्दीबरोबरच सांस्कृतिक अंगानेही अतिशय समृध्द आहे. सृष्टीची उत्पत्ती, मुखवट्याचा वापर, पौराणिक संकल्पना यावर आधारित लोकनाट्ये गोमंतक रंगभूमीवर अगदी प्राचीन काळापासून चालत आलेली दिसतात. ही सर्व लोकनाट्ये विधीनाट्य असल्याने त्यांना धार्मिकतेचे अधिष्ठान प्राप्त झाले आहेत.

ए. ए. मॅक्डोनल्ड यांच्या मते, 'धर्म म्हणजे एकीकडे दैवी किंवा अद्‌भुत शक्ती यावर मानवाने ठेवलेल्या श्रद्धांचा समुच्चय होय. दुसरीकडे त्यांची प्रार्थना व स्तुती यांच्या रूपाने वाचिक आणि धार्मिक विधी व यज्ञयागाच्या रूपाने कायिक असे या शक्तीवर अवलंबून असल्याचे प्रकटीकरण होय.'[१]

गोमंतकीय लोकसाहित्याचे अभ्यासक विनायक खेडेकर यांच्या मते 'कलेचे प्रदर्शन हे लोकनाट्याचे कारण नसते, विशिष्ट शैलीतून विधीचे आचरण ही समूह मनाने जोपासलेली लोकजीवनातील परंपरा असते.' खेडेकर यांनी गोमंतकीय लोकनाट्याच्या चार प्रवृत्ती मानल्या त्यांच्या मते, 'सृष्टी उत्पत्तीपूर्वीची कथा, मुखवट्याचा वापर असलेली प्राचीन गणली गेलेली 'पेरणी जागर' ची प्रवृत्ती, विष्णूच्या दशावतार संकल्पनेवर आधारित काला या प्रकारची प्रवृत्ती, रामकथा शैलीतून सांगणाऱ्या रणमालेची प्रवृत्ती, पुराणकथांशी संबंध नसलेल्या सामाजिक विषयातून नाट्यविष्करण करणाऱ्या गावडा जागराची शैली अशा चार प्रवृत्ती आहे.[२] गोमंतकीय लोकनाट्यामध्ये जागर, कालो, रणमाले व दशावतार हे चार प्रमुख नाट्यप्रकार दिसतात.

या प्रवृत्तीतील पहिले लोकनाट्य म्हणजे जागर. जागर या प्रकारांमधील गावडा जागर, ख्रिस्ती जागर, हिंदु आणि ख्रिस्ती दोन्ही धर्मातील लोकांनी एकत्रित येऊन सादर केलेला शिवोली या गावचा शिवोली जागर व पेरणी जागर.

पेरणी जमाती करवी सादर होतो तो पेरणी जागर. हा एक वार्षिक विधी उत्सव आहे. सृष्टीउत्पत्ती पूर्वीची कथा यामध्ये येते. गणपती, सरस्वती, शंकर ही दैवते प्रामुख्याने या लोकनाट्यामध्ये येतात. 'जालिमन' नावाचा एक राक्षसही येतो ज्याचा देवी वध करते. देवी पात्राची भुमिका पुरुषच करतो. देवीने केलेला दैत्याचा संहार यामध्ये सुष्ट व दुष्ट यामधील नैतिक भुमिका दिसते. या मध्ये आलेले एक महत्त्वाची भुमिका म्हणजे म्हातारीचे सोंग, आदिमाया पातली गा असे म्हणत हातात काठी घेऊन म्हातारी मांडावर येते. त्यानंतर अनेक मुखवटे घालून पात्रे येतात. खेडेकर यांच्या मते या पेरणी जागरमध्ये पेरण्यामधील दोन माणसे एक सफेद पडदा प्रेक्षकांच्या समोर धरतो. याचा अर्थ सृष्टी उत्पत्ती पूर्वी निराकार अवकाश होते हे दाखवण्याचा प्रकार पांढऱ्या पडद्याने सूचित होतो.[३]

पेरणी जागराबरोबर दैत्यांचा जागर, दिवजांचो जागर व चोरांचा जागर असे उत्सव होतात. या नाट्यामध्ये पात्रे काही पात्रे अश्लील भाषण करतात त्यामुळे लोकांचे मनोरंजन होते. एके ठिकाणी पेरणी जागरमध्ये गणपती व सरस्वतीबरोबर महादेव कमरेला लिंग बांधून येतो. गणपती ऐवजी महादेवाची पूजा होते. महेश्वासूराचे आख्यानही होते. देव व दानव यांच्यामधील संघर्ष हे या लोकनाट्याचे प्रमुख सूत्र आहे. तर जागर हा उत्सव देवतांना संतुष्ट करण्यासाठी केला जातो. चोराच्या जागराच्या वेळी चोराला शिक्षा म्हणून कोंबडा बळी देण्याची प्रथा दिसते. या पेरणी जागरामध्ये पेरणी प्रमुख शर्ट पँटच्या वेषातच, डोक्यावर शाल ओढून देवादिकांचे पारंपरिक वेगवेगळे मुखवटे घेऊन नाचतो. जागर म्हणजे जागरण नव्हे तर देव-देवतांना जागृत करण्याचे विधी असेही मानले जाते.

कालो या प्रकारात संकासुर कालो, बाळक्रिडा कालो, गवळण कालो, दही कालो असे प्रकार दिसतात. काला या प्रकारात आख्यान असते. यामध्ये असलेले संकासूर हे पात्र प्रेक्षकांच्या अधिक पंसतीस उतरते. काल्याचे स्वरूप करमणूकप्रधान आहे. कालोत्सव हा वैष्णव पंथाच्या प्रसारातून उजेडात आला असे मानण्यात येते. श्री हरी विष्णू अवताराच्या भक्तीचा प्रभाव गोमंतक प्रदेशावर दिसून येतो. कालो या नामकरणाचे वेगवेगळे अर्थ सापडतात. श्रीकृष्णाने संवगड्यासह अनेक पदार्थ एकत्र कालवून खाल्ले या पदार्थाला कालो असे नाव आहे. माणसे कलकलाट बोलत असतील तर 'कित्याक कालो करता रे ? या कोकणी वाकप्रचारात 'कलकलाट' या अर्थाने काला आलेला आहे. तर कालो म्हणजे 'सगळी रात्र जागवणे' असेही मानले जाते. यातील रात्र जागवणे हे अधिक समर्पक वाटते.

दशावतार ह्या लोकनाट्याची एक समृद्ध परंपरा दिसते. पूर्वी मातीचे मुखवटे केले जात असायचे ते आता कागदाच्या लागद्यापासून अथवा लाकडापासून तयार केले जातात. दशावतारी खेळामधील नृत्य हे अतिशय कौशल्यपूर्ण असते. सोंगातील सूत्रधार सोडून सगळीच सोंगे नृत्य करतात. राक्षसांच्या उड्यामध्ये एक ताल वलय असते. युध्ददृष्ये ही नृत्यात्मकच असतात. समाजजीवनातील नाट्याचे स्थान दर्शविताना लोकसाहित्य संशोधक प्रभाकर मांडे म्हणतात, 'लोकरंगकर्मींना यातून कलात्मक

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010
ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

आविष्काराचे समाधान मिळते. सर्जनाचा आनंद मिळतो. संगीत, नृत्य, नाट्य, मुखवट्यांच्या संदर्भात शिल्प इत्यादी कलाविष्कारांचा त्यात उत्तम मेळ असतो. कलानिर्मितीचा आनंद त्यात सहभागी झालेले लोक घेतात. गावातील समूहभावाचे जतन आनंदोर्मीची अभिव्यक्ती पंरपरा सातत्य टिकवल्याचे समाधान आपल्या कलात्मक आविष्कारासंबंधीचा अभिमान जागा ठेवणे ह्याबाबी यांतून सहजपणे घडतात. हेच याचे कार्यात्मक मूल्य होय.[४] एकंदरीत या सर्व नाट्याचे स्वरुप रंजनात्मकतेकडे वळत असलेले दिसते. या लोकनाट्यामागे काही पारंपरिक श्रध्दा असलेल्या दिसतात. 'घरघडयो' हे संवग सादर झाल्याशिवाय कोणीही जागर सोडून गावची सीमा ओलांडून जाऊ शकत नाही. तसेच रणमालेमध्ये 'म्हसोबा' हे सोंग झाल्याशिवाय कुणीच गावची सीमा ओलांडून जात नाही. एकप्रकारे गाव आणि गावातील गावकर याचे वाईट शक्तीपासून संरक्षण व्हावे, भूतप्रेत बाधा होऊ नये, जीवनात सुख- कल्याण व्हावे याकरीता स्थानिक देव-देवतांना प्रसन्न करून जागृत ठेवण्याकरीता धर्माचे अधिष्ठान लाभलेली अशी ही गोमंतकीय पंरपरेतील लोकनाट्ये होय. विशिष्ट कुटुंबातील व्यक्ती, विशिष्ट तिथी, विशिष्ट दिवस, विशिष्ट स्थळ, विशिष्ट वाद्ये अशा प्रकारची विधीनिष्ठ लोकपरंपरा या लोकनाट्यातून आविष्कृत होतात.

'मानववंशशास्त्रज्ञाचे असे मत आहे की लोकनाट्य व नृत्य व इतर प्रकार हे विधींमधून उगम पावलेले आहेत. विधी हीच नाट्याची गंगोत्री आहे'.[५] या नाट्याचे स्वरुप आजही विधीनाट्याचेच राहिले आहे. विधी हे अखिल समूहाचे असतात आणि एकाच वेळी समूहमनाच्या धर्मप्रेरणेचे समराधन करीत समूहाच्या कलानंदाची भूकही भागवितात. आत्मरक्षणाच्या अंतःप्रेरणेतून धर्मामध्ये असलेल्या अनेक विधींचा प्रारंभ झाला. या अद्भुत शक्तीचा म्हणजे देव-देवतांचा कृपाप्रसाद मिळावा म्हणून त्याचे स्तुतीगान करणे, भेट वस्तू देणे, प्रार्थना करणे सुरु झाले. ह्या सर्व विधी धर्माचा एक भाग बनला त्याच्यातून श्रद्धा निर्माण झाल्या. लोकनाट्यामध्ये जसे नाट्य असते, संवाद असतात, अभिनय असतो, तसे नृत्यही असते. या नृत्याची एक विशिष्ट पध्दती असते. इतर भारतीय लोकनाट्यप्रमाणे रामायण, महाभारतातील गोमंतकीय लोकरंगभूमीवर महत्त्वाचे स्थान असलेले दिसते. मुखवटे धारण करणे हे या लोकनाट्याचे प्रमुख विषय आहे. या लोकनाट्यातून आलेल्या देव-देवता लोकजीवनातील संस्कृतीचे आधारस्तंभ आहे.

रणमाले हे लोकनाट्य शिगमोत्सव व गुढीपाढव्याला केले जाते. तसेच गोमंतकाला लागून असलेल्या सीमाभागावर सादर केले जाते. या लोकनाट्यामध्ये सोंग, ढोंग हे प्रकार आढळतात. पारंपारिक रामायण, महाभारत, पुराणे यामधील लोककथा त्यामध्ये येतात. इतर लोकनाट्याप्रमाणे ही लोकनाट्ये साहित्यिक गुणांनी नटलेली नाहीत. सर्वांना समजणारी नित्य व्यवहरातील संवाद त्यामध्ये असतात. सहज अभिनय सामान्य जनास रूचणारे असे लोकसंगीत साधा-सुटसुटीत रंगमंच अशी रचना असल्याने कृत्रिमतेचा स्पर्श झालेला नसतो. एकंदरीत जनमानसाला रूचणारा असा हा कलात्मक लोकाविष्कार आहे. धार्मिकतेचे अधिष्ठान लाभलेली ही लोकनाट्ये दरवर्षी नित्यनूतनता घेऊन येते.

अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या मते मानवी जीवनातील लोकसाहित्याचे प्रकार त्रिविध रूपातविचारात घ्यावे लागतात.

१. माणसाची वर्तन परंपरा – या परंपरेत व्यक्तिगत वर्तने आणि सामुहिक वर्तने यांचा निश्चित अनुबंध प्रकट होत असतो.

२. माणसाच्या वस्तू किंवा साधन परंपरा- ह्या परंपराही प्रत्यक्ष अवलंबविताना व्यक्ती आणि समाज यांचा निश्चित अनुबंध प्रकट करीत असतात.

३. मौखिक किंवा शाब्द परंपरा – या परंपरेलाच 'भाषा' अशी संज्ञा आहे. भाषेचा वापर करतानाही व्यक्ती आणि समाज यांचा निश्चित अनुबंध शब्दाच्या सार्थ रूपातून प्रकट होत असतो.[६]

लोकनाट्यातून प्रकट झालेला अनुबंध हा सामुहिक वर्तनातून निर्माण झालेला आहे. 'दैवत उपासना तीन गोष्टीसाठी लोकजीवनात प्रवर्तित झालेली पाहावयास मिळते.

१. भय निवारण

२. प्राप्ती

३. मोक्ष किंवा जीवनमुक्ती यात पहिल्या दोन गोष्टीसाठी मोठ्या प्रमाणावर आचार तंत्र निष्पन्न झालेले दिसते.[७]

एकंदरीत या लोकनाट्याचे स्वरूप पाहता पुढील काही निष्कर्ष नोंदवता येतात.

१. धर्मविधी आणि करमणूकीचा सुरेख संगम निदर्शनास येतो.
२. गावाच्या सुरक्षिततेसाठी व समृध्दीसाठी ही नाट्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडतात.
३. परंपरेतील वारस हक्काने ही नाट्ये केली जातात.
४. संवादाच्या बाबातीत पूर्ण स्वातंत्र्य असते.
५. विधीयुक्त असे या लोकनाट्याचे स्वरूप असते.
६. देवदेवतांची सोंगे घेणे या प्रमुख विशेषामागे धार्मिक श्रध्दा असते.
७. धार्मिकतेबरोबरच मनोरंजन हे प्रयोजन असते परंतु ते गौण असते.
८. अतिमानवी पात्रे त्यामध्ये येतात, जी प्रेक्षकांच्या ठिकाणी असलेल्या अद्भुततेचे आकर्षण दर्शवितात.

ISSN - 2229-4929
**UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal**

नागर रंगभूमीचा प्रभाव काही अंशी परंपरेने चालत आलेल्या या लोकनाट्यावर पडत असलेला जाणवतो. पडद्यांचा वापर, आधुनिक वाद्यांचा वापर, वेशभूषा व रंगभूषा यासाठी वापरलेली सामग्री यामध्ये परिवर्तन झालेले आढळते. नृत्याच्या आकर्षक पदन्यास निर्माण झालेले दिसतात. युद्धनाट्याची पूर्वदिग्दर्शित नृत्यशैलीचा अंगीकार केला जातो. संवादामधील स्वयंस्फुर्तता कमी झालेली दिसते. त्यावर आकर्षक संस्कार झालेले दिसतात. अद्यावत करण्याच्या प्रयत्नामध्ये त्यातील पारम्पारिकतेला धोका उत्पन्न होत आहे. पारंपारिकतेपेक्षा त्याला स्पर्धाचे स्वरूप प्राप्त झाल्याने ते प्रदर्शनात्मकतेकडे व मनोरंजनात्मकतेकडे झुकू लागले आहे. त्यामुळे त्याचा गाभा नष्ट होण्याची भीती नाकारता येत नाही.

**संदर्भ ग्रंथ**

१. धर्माचा वैदिक वाङ्मयातील उदय आणि विकास, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब शामराव देशमुख, अनुवादः आनंद पाटील, अमरावती विद्यापीठ, अमरावती, २००४, पृ. १३

२. खेडेकर, विनायक, लोकसरिता, कला अकादमी गोवा, १९९३ पृ.२१२

३. तत्रैव, पृ.२१४

४. मांडे, प्रभाकर, 'लोकरंगभूमी', पृ.१०९

५. मांडे, प्रभाकर, लोकसाहित्याचे अंत: प्रवाह, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१३६

६. सहस्त्रबुद्धे, अनिल, लोकबंधात्मकचिकित्सा, नितीन प्रकाशन, पुणे, पृ. ९७

७. तत्रैव, पृ. ९७